आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १६ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. विदर्भात धवलक्रांती घडवून आणण्यासाठी मदर डेअरी सहाय्यभूत ठरेल -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मदर डेअरी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमीपूजनाप्रसंगी प्रतिपादन.

2. विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाच्या तीन उमेदवारांची नावं जाहीर; नागपुरातून संदीप जोशी, तर वर्ध्यातून दादाराव केचे यांचा समावेश.

3. नागपूरच्या पारडसिंगा येथे "नव्या भारताचे नवे कायदे- भारतीय न्याय संहिता २०२३" या विषयावरील मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शनीचे आजपासून आयोजन.

4. विदर्भात आज वर्धा, चंद्रपूर येथे उष्णतेचा ऑरेंज अलर्ट, तर नागपूर, अमरावती, अकोला जिल्ह्यात उष्णतेचा यलो अलर्ट जारी.

मदर डेअरी

विदर्भात धवलक्रांती घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय दूध उत्पादन विकास महामंडळ एनडीडीबी द्वारे संचालित मदर डेअरी सहाय्यभूत ठरेल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरमध्ये केले. नागपूरच्या सिव्हिल लाईन्स येथे मदर डेअरी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. सुमारे 550 कोटींच्या या प्रकल्पाव्दारे विदर्भातील दुग्ध उत्पादकांकडून दूध संकलित करून विविध दुग्ध उत्पादनांची निर्मिती नागपुरात होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी एनडीडीबीचे अध्यक्ष डॉ. मिनेश शहा उपस्थित होते. वर्ष 2016 पासून मदर डेरी आणि महाराष्ट्र शासन यांच्यात दुग्ध उत्पादनाच्यासाठी सामंजस्य करार करण्यासाठी आपण प्रयत्नशील होतो. त्यातूनच महाराष्ट्र शासनाच्या नागपूरच्या दुग्ध योजनेच्या सिविल लाईन्स येथील जागेवर मदर डेअरीचा भव्य प्रकल्प उभा राहिला आहे, असे गडकरी यांनी यावेळी सांगितले. मदर डेअरीने आता पशुवैद्यकीय तज्ञांच्या मदतीने स्थानिक गोपालकांच्या गाईंच्या चांगल्या वाणांसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे सांगून गडकरी यांनी मदर डेअरी मार्फत पशुवैद्यकीय तज्ञ एम्ब्रो ट्रान्सफर तसेच इन विट्रो फर्टीलायझेशन (आयव्हीएफ) सारखे आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत तसेच दुग्ध उत्पादकांपर्यंत पोहोचेल, अशा रीतीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. पशुधनाला चांगला चारा मिळण्यासाठीची सूचना गडकरींनी यावेळी मदर डेअरीला केली.

*आप जो पशु खाद्य तैयार करते हैं उसका रॉ मटेरियल अवेलेबल है। हमारे भंडारा गोंदिया, चंद्रपुर और नागपुर जिले के आधे भाग में चावल होता है और यहाँ राइस ब्रांड का तेल के भी सॉल्वेंट प्लांट है। इसकी जो केक है  सॉल्वेंट प्लांट से राइस ब्रांडी की निकलती है, वो यहाँ है। विदर्भ मराठवाडा  में कपास होता है तो सरकी की ढेप है। तो आप हमारे क्षेत्र में डिस्ट्रिक्ट वाइज लॉजिस्टिक कॉस्ट को कम करते हुए ₹2 किलो क्वालिटी के साथ कोई कॉंप्रमाइज़ ना करते हुए आपके स्टैंडर्ड के हिसाब से अगर पशु खाद्य दे सकेंगे तो किसानों का इसमें बहुत बड़ा फायदा होगा। और नेपियर ग्रास  को सिलोस में रख कर साल भर ग्रीन घास मिलेगा, हरा ग्रास भी मिलता है। पशु खाद भी अच्छा मिलता है तो दूध का उत्पादन भी अच्छा होगा।*

मदर डेअरीच्या मार्फत नागपूर येथील सुप्रसिद्ध संत्रा बर्फीचे देखील विपणन होणे आवश्यक आहे. ही बर्फी शुद्ध संत्र्यांचा पल्प वापरूनच तयार केली जाईल. त्यामुळे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना देखील फायदा होईल, असा विश्वास गडकरींनी यावेळी व्यक्त केला.

विधान परिषद उमेदवारी

महाराष्ट्र विधानपरिषद पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय निवडणूक समितीकडून नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर संदीप जोशी, छत्रपती संभाजीनगरचे भाजपचे सरचिटणीस संजय केनेकर आणि वर्ध्याच्या आर्वीचे माजी आमदार दादाराव केचे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पाच विद्यमान आमदारांच्या अलिकडच्या विजयामुळे या पोटनिवडणुका आवश्यक झाल्या आहेत. यापैकी तीन आमदार भाजपचे होते, तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रत्येकी एक जागा जिंकली. हे तिन्ही पक्ष महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीचा भाग आहेत. पोटनिवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १७ मार्च आहे. १८ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारांना २० मार्चपर्यंत त्यांचे अर्ज मागे घेता येतील. २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी मतमोजणी होईल. दरम्यान, सोलापुरातून माजी आमदार राम सातपुते किंवा माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नावाची अनेकांना अपेक्षा होती. सातपुते यांचं नाव तर सर्वाधिक आघाडीवर होते. पण पक्षाने इतर तीन नावे जाहीर केल्याने सोलापुरातून कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.

## तुकाराम बीज सोहळा

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचं सदेह वैकुंठ गमन अर्थात तुकाराम बीज सोहळा आज पुणे जिल्ह्यात श्रीक्षेत्र देहू इथं साजरा होत आहे. यंदाचा हा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा आहे. या सोहळयासाठी राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येनं दाखल झाले असून प्रशासनानं चोख बंदोबस्त केला आहे. देहूमध्ये अखंड हरिनाम सप्ताह आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. संत तुकाराम महाराज देहू संस्थानच्या वतीनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सेवा- सुविधांसाठी घेतलेल्या विशेष प्रयत्नांची आणि- निर्मल वारी, हरित वारी संकल्पनेत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. तुकाराम महाराजांनी चारशे वर्षांपूर्वी मराठी भाषेत तत्त्वज्ञान सांगितलं, असं नमूद करत, तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वरांनी धर्माबरोबरच लोकशिक्षण आणि प्रबोधनाचं मोठं कार्य केलं, असं मनोगत शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केलं.

## दहावी- बारावी निकाल

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची ११ फेब्रुवारीपासून तर दहावीच्या विद्यार्थ्यांची २१ फेब्रुवारीपासून परीक्षा सुरू आहे. परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस अगोदर सुरू झाल्याने निकाल देखील १५ मे पूर्वीच जाहीर केला जाणार आहे. त्या अनुषंगाने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या विभागीय मंडळांकडून तपासलेल्या उत्तरपत्रिकांचा दररोज बोर्डाचे अधिकारी आढावा घेत आहेत. या परीक्षेत भरारी पथकांनी नऊ विभागीय मंडळांतर्गत २०० हून अधिक विद्यार्थ्यांवर कारवाई केली आहे. अजून बारावीच्या विद्यार्थ्यांचा माहिती तंत्रज्ञान (आयटी) विषयाचा पेपर राहिला असून दहावीच्या विद्यार्थ्यांचेही दोन पेपर बाकी आहेत. उद्या १७ मार्च रोजी परीक्षा संपणार आहे.

## प्रदर्शन

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूरतर्फे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर आणि श्री सती अनुसया माता देवस्थान, पारडशिंगा यांच्या सहकार्याने श्री सती अनुसया माता देवस्थान, पारडशिंगा, तहसील काटोल, जिल्हा नागपूर येथे ''नव्या भारताचे नवे कायदे-भारतीय न्याय संहिता २०२३' या विषयावर दोन दिवसीय मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनीचे उदघाटन वरिष्ठ प्रशासकीय न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर तथा पालक न्यायमूर्ती जिल्हा नागपूर न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी  मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर तथा पालक न्यायमूर्ती अभय मंत्री, आमदार चरणसिंग ठाकूर, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित होते. या प्रदर्शनात  केंद्र शासनाने १ जुलै २०२४ पासून लागू केलेल्या नवीन कायद्याविषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी  16 ते 17 मार्च दरम्यान आयोजित  दोन दिवसीय प्रदर्शनाला सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळात भेट देऊन प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी केले आहे.

<u>जीएम एमसीओ कॅट उद्घाटन</u>

पायाभूत विकास तसेच बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या मोठ्या उद्योगांनी पेट्रोल आणि डिझेल ऐवजी जैवइंधन तसेच विद्युत उर्जेवर संचालित मशिनरी विकसित करावी, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरमध्ये केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ - एमआयडीसीच्या बुटीबोरी येथील औद्योगिक क्षेत्रांमध्ये जीएमएमसीओ कॅट या पायाभूत सुविधा आणि खनन क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीच्या एकात्मिक सुविधेचे तसेच तंत्रज्ञान दिवस 2025 चे आज गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते. जीएमएमसीओ कॅटच्या या बुटीबोरीमधील एकात्मिक सुविधेमुळे 3000 युवकांना रोजगार मिळणे ही समाधानकारक बाब असल्याचे देखील गडकरी यांनी स्पष्ट केले.

<u>*This is really a great pleasure for me that in this plant you are giving jobs to 3,000 people. That is very important. That's the reason I am coming here to inaugurate this plant. Only the request is to take maximum people from this area. You train them, we have 49 engineering colleges. Even you can make training center for the young people, you can give them appropriate training. They will be an asset for you.*</u>

शेतकरी हा अन्नदाता आहे परंतु आता कृषीचे वैविध्यकरण हे इंधन आणि ऊर्जा या क्षेत्रात होणे आवश्यक असून शेतकरी हा अन्नदाता सोबतच ऊर्जादाता झाला पाहिजे, असे गडकरी यांनी यावेळी सांगितले. नागपूर येथे नव्याने स्थापित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनानंतर येथील पहिले विमान हे शेतकऱ्यांनी तयार केलेल्या बायो एविएशन इंधनानेच भरारी घेईल, असा विश्वास देखील गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

हवामान

विदर्भात आज वर्धा चंद्रपूर येथे उष्णतेचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला असून नागपूर, अमरावती, अकोला जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी उष्णतेचा यलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे. येत्या दोन दिवसात विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे, तर 19 ते 20 मार्च दरम्यान पूर्व विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

******